# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक १ जुलै, २०२६

## (सकाळी ११-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(अ) तारांकित प्रश्न**

**(ब) तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**ग्रामविकास मंत्री** : "राज्यातील जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांची बदली प्रक्रिया प्रलंबित असल्याबाबत" या विषयावरील श्री.मोहन मते व इतर वि.स.स. यांच्या दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक १६५९२ च्या अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**माजी सैनिक कल्याण मंत्री** : महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : विनंती अर्ज सादर करणे -**

**श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** : "कर्नाटका पॉवर कार्पोरेशन लि. बरांज मोकासा (ता.भद्रावती, जि.चंद्रपूर) या कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**पाच : औचित्याचे मुद्दे**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(१) डॉ. नितिन राऊत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास) लक्ष वेधतील :-**

"राज्य शासनाने राज्यातील महानगरपालिका आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी ४,९६८ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली असणे, यामध्ये नागपूर जिल्ह्याला प्राधान्य देत रुपये १,०१६ कोटी मंजूर केलेले असणे, मात्र प्रत्यक्षात केवळ ३४६.७७ कोटी रुपयांचा निधी आतापर्यंत वितरित करण्यात आल्यामुळे नागपूरमधील अनेक महत्त्वाचे विकास प्रकल्प पूर्णपणे रखडण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, नागपूर शहरात सन २०२३ मध्ये आलेल्या भीषण पुरामुळे उत्तर नागपूरचे मोठे नुकसान झाले असणे, रस्ते दुरुस्ती, पिवळी नदी, नागनदीची संरक्षण भिंत आणि पूर प्रतिबंधक उपाययोजनांसाठी शासनाने निधी रोखून ठेवलेला असणे, यामुळे पावसाळ्यापूर्वीची अत्यंत महत्त्वाची कामे रखडण्याची आणि पुन्हा पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, नागपूर महानगरपालिकेने प्रलंबित कामांसाठी जवळपास ४५० कोटी रुपयांची मागणी केलेली असणे, त्या तुलनेत अत्यंत कमी निधी मिळालेला असणे, शासनाचा निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्ग झाला असूनही तो अद्याप महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आलेला नसल्याने तसचे 'उपयोगिता प्रमाणपत्र' (Utilization Certificate) सादर करण्याच्या जाचक अटींमुळे प्रत्यक्ष कामे सुरू करण्यास विलंब होत असणे, पावसाळा जवळ आलेला असताना सिमेंट रस्ते,सांडपाणी वाहिन्या, नाले आणि इतर मुलभूत नागरी सुविधांची कामे निधीअभावी अर्धवट अवस्थेत असणे, यामुळे नागरिकांच्या जिवीताला धोका निर्माण झालेला असणे, यामध्ये राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री.राजेश विटेकर, डॉ.राहूल पाटील, श्री.रत्नाकर गुट्टे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"परभणी जिल्ह्यात माहे जून महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे सोनपेठ, पाथरी, मानवत, परभणी, पूर्णा, पालम व गंगाखेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खरीप हंगामातील पिके तसेच ऊस , केळी, भाजीपाला, फळबागा व इतर प्रमुख पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, सोबतच विद्युत पोल, सोलर पॅनल, डी पी, यांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे, शेतकऱ्यांनी वर्षभर कष्ट करून, कर्ज काढून, खत, बियाणे, औषधे यावर मोठा खर्च केल्यानंतर ही उभी पिके या अवकाळी पावसामुळे पूर्णपणे आडवी पडलेली असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला जाणे, आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे आर्थिक संकटात असलेला शेतकरी आज पूर्णपणे हतबल होणे, परिणामी शेतकऱ्यांमध्ये वाढते नैराश्याचे वातावरण, सदरहू बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्यामुळे शासनाने तातडीने संबंधित तहसीलदार, कृषी अधिकारी आणि महसूल

विभागाच्या अधिकाऱ्यांना नुकसानग्रस्त भागाचे गतीने पंचनामे करण्याचे आदेश देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत आणि नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री.हेमंत ओगले, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील काही पतसंस्था व मल्टिस्टेट सहकारी संस्थांमध्ये बनावट खाती उघडून, बेनामी ठेवी स्वीकारून तसेच संशयास्पद आर्थिक व्यवहारांद्वारे हवाला व मनी लॉन्ड्रिंगसदृश व्यवहार सुरू असल्याची बाब माहे एप्रिल, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आलेले असणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील समता पतसंस्थेमध्ये वेगवेगळ्या नावांनी सुमारे १०० बँक खाती उघडून अंदाजे ६० कोटी रुपयांचे व्यवहार एका व्यक्तीकडून नियंत्रित केले जात असल्याची बाब तपासात समोर आली असणे, केवायसी (KYC) प्रक्रियेत फेरफार करणे, व्यवहारांचे खरे लाभार्थी लपविणे, बेनामी खाती चालविणे व काळा पैसा पांढरा करण्यासाठी विविध संस्थांचा वापर होत असल्याची दाट शक्यता निर्माण झालेली असणे, अहिल्यानगर जिल्ह्यातील इतर काही पतसंस्था, बँका व मल्टिस्टेट संस्थांमधील घराणेशाही, कागदोपत्री निवडणुका, नियमबाह्य शाखा विस्तार, संशयास्पद सोनेतारण व्यवहार व कोट्यवधी रुपयांच्या ठेवींविषयी चौकशीची आवश्यकता असणे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित पदाधिकारी, अधिकारी, लेखापरीक्षक व आर्थिक गैरव्यवहारात सहभागी व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत तसेच आर्थिक गुन्हे शाखा, अंमलबजावणी संचालनालय (ED), आयकर विभाग अथवा अन्य केंद्रीय यंत्रणांमार्फत तपास करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच सदर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सभासद, नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(४) श्री.विक्रम पाचपुते, डॉ.तुषार राठोड, श्री.अनिल मांगुळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात सर्पदंश ही गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या असून दरवर्षी हजारो नागरिकांना त्याचा फटका बसणे, विशेषतः शेतकरी, शेतमजूर, वनक्षेत्रातील नागरिक, आदिवासी समाज आणि ग्रामीण भागातील लोक यांना सर्पदंशाचा सर्वाधिक धोका असणे, भारतातील जैवविविधतेमुळे अनेक प्रकारचे विषारी साप अस्तित्वात असताना उपचारासाठी प्रामुख्याने एकाच प्रकारचे पॉलीव्हॅलेंट अँटी-स्नेक व्हेनम उपलब्ध असणे, वैज्ञानिक संशोधनातून असे निदर्शनास आले आहे की विविध प्रदेशांतील सापांच्या विषांमध्ये रासायनिक व जैविक पातळीवर फरक असू शकतो त्यामुळे सर्व प्रकारच्या सर्पदंशांवर एकाच प्रतिविषाची परिणामकारकता समान राहतेच असे नाही, परिणामी काही रुग्णांमध्ये

उपचाराचा अपेक्षित परिणाम मिळण्यास विलंब होऊ शकतो किंवा अतिरिक्त गुंतागुंत निर्माण होणे, शासनाने सर्पदंश प्रतिबंध व उपचारासाठी स्वतंत्र धोरण जाहीर करणे, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये पुरेसा प्रतिविष साठा उपलब्ध करणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे, सर्पदंशाची अचूक नोंद व संशोधन व्यवस्था उभारणे आवश्यक असणे तसेच ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये प्रतिविषाचा अपुरा साठा, प्रशिक्षित वैद्यकीय मनुष्यबळाची कमतरता, तातडीच्या उपचार सुविधांचा अभाव आणि रुग्ण वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढण्याची शक्यता असणे, अनेक भागांत सर्पदंश झालेल्या रुग्णांना वेळेत उपचार मिळत नसल्याने जीवितहानी होत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) डॉ.राहूल आहेर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"नाशिक जिल्हयात महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत गैरव्यवहार झालेला असणे, राज्य आरोग्य हमी सोसायटी सन २०२४ ते २०२६ च्या तपासणीत राज्यातील सुमारे १६ हजार संशयित दावे व शस्त्रक्रियांची नोंद आढळून आली असून त्यापैकी ९५०० प्रकरणे नाशिक जिल्ह्यातील असल्याचे समोर आले असणे, अस्तित्वात नसलेल्या अथवा प्रत्यक्ष उपचार न घेतलेल्या रुग्णांच्या नावावर शस्त्रक्रिया दाखवून आर्थिक दावे उचलण्यात आल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला असणे, या प्रकरणी नाशिकमधील पाच रुग्णालयांची योजनेतील मान्यता रद्द करण्यात आली असून आर्थिक व्यवहार, उपचार नोंदी व शस्त्रक्रिया अहवालांमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती आढळल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच नाशिक व मालेगाव परिसरात दलाल, रुग्णालय कर्मचारी व इतर संबंधितांचे संघटीत रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता वर्तविण्यात येत असणे, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करणे, अपहार झालेल्या निधीची वसुली करणे, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र औद्योगिक संबंध (निरसन) विधेयक, २०२६

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८ - महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६

---

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

(ख) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ.नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ङ) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. भास्कर जाधव, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ - महाराष्ट्र औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्याप्रमाणे विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) (क)** भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०२६ चा अध्यादेश क्रमांक ६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२६ नापसंत करते."

**(ख) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १० - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

(२) **सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

(ड) **विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४५ - महाराष्ट्र मुद्रांक (तिसरी सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** (क) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, श्रीमती ज्योती गायकवाड, डॉ. विश्वजित कदम, सर्वश्री साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक व डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**आठ : (मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, दिलीप वळसे-पाटील, योगेश सागर, अब्दुल सत्तार, धनंजय मुंडे, अतुल भातखळकर, अर्जुन खोतकर, चेतन तुपे, कालिदास कोळंबकर, दिपक केसरकर, ॲड. माणिकराव कोकाटे, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. तानाजी सावंत, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री राजेंद्र गावित, धर्मरावबाबा आत्राम, संजय उपाध्याय, विजय शिवतारे, राजकुमार बडोले, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, संजय बनसोडे, पराग शाह, प्रदिप जैस्वाल, सर्वश्रीमती सुलभा खोडके, विद्या ठाकूर, डॉ. बालाजी किणीकर, श्री. शेखर निकम, कॅ. आर. तमील सेल्वन, सर्वश्री विलास तरे, प्रताप पाटील-चिखलीकर, राम कदम, चंद्रदीप नरके, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री रविंद्र चव्हाण, नरेंद्र भोंडेकर, दिलीप बनकर, संजय केळकर, मंगेश कुडाळकर, श्रीमती सरोज अहिरे, सर्वश्री किसन कथोरे, किशोर पाटील, राजेश विटेकर, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री शांताराम मोरे, सुनिल शेळके, प्रशांत ठाकूर, प्रकाश सुर्वे, चंद्रकांत नवघरे, महेश चौघुले, निलेश राणे, काशिनाथ दाते, नरेंद्र मेहता, तुकाराम काते, सचिन पाटील, महेश बालदी, अशोक पाटील, मनोज कायंदे, कुमार आयलानी, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री राजन नाईक, बालाजी कल्याणकर, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. सुहास कांदे, श्रीमती सुलभा गायकवाड, सर्वश्री संजय गायकवाड, हरिश्चंद्र भोये,**

**श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री रविशेठ पाटील, महेंद्र थोरवे, सिध्दार्थ शिरोळे, महेंद्र दळवी, प्रविण दटके, चंद्रकांत पाटील, मोहन मते, संतोष बांगर, सुनिल कांबळे, विश्वनाथ भोईर, महेश लांडगे, दिलीप लांडे, ॲड. राहूल कुल, सर्वश्री महेश शिंदे, शंकर जगताप, आमश्या पाडवी, हेमंत रासने, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, डॉ. संजय कुटे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री रणधीर सावरकर, मुरजी पटेल, सुमित वानखेडे, आनंद तिडके, सुधीर मुनगंटीवार, अमोल पाटील, विनोद अग्रवाल, सुहास बाबर, राजेश बकाने, विलास भुमरे, चरणसिंग ठाकूर, राजेश मोरे, विक्रम पाचपुते, विठ्ठल लंघे, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री किरण सामंत, बबनराव लोणीकर, राजेंद्र यड्रावकर-पाटील, प्रशांत बंब, शरददादा सोनावणे, अभिमन्यु पवार, डॉ.अशोकराव माने, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री सुरेश भोळे, सुरेश धस, अतुलबाबा भोसले, सर्वश्रीमती देवयानी फरांदे, सीमा हिरे, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे, सचिन कल्याण-शेट्टी, गोपिचंद पडळकर, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, शिवाजी पाटील, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री अक्षय कर्डिले, राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, हरिष पिंपळे, विजय देशमुख, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री प्रकाश भारसाकळे, प्रताप अडसड, देवराव भोंगळे, राजेश पवार, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रवी राणा, राणाजगजितसिंह पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अमल महाडिक, समाधान आवताडे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"मुंबई, ठाणे व कल्याण महानगरपालिकांच्या निवडणूका होऊन महानगरपालिका सभागृहांची स्थापना झाल्यानंतर मागील काही महिन्यांमध्ये महानगरपालिकांच्या प्रशासनात पारदर्शकता व कार्यक्षमता राहण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण सुधारणा करण्यात येणे, मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येणाऱ्या २७ वस्तूंची खरेदी तसेच आरोग्य विभागाची खरेदी 'जेम' पोर्टलमार्फत करण्यात येणे, सुमारे १ हजार कोटींची अनावश्यक निविदा रद्द करण्यात येणे, गारगाई-पिंजाळ जल प्रकल्पाच्या खर्चामधून सुमारे २८० कोटींची बचत करण्यात येणे, महानगरपालिका रुग्णालयांमधील रुग्णसेवा व रुग्णस्थिती प्रणाली ऑनलाईन करण्यात येणे, शहरातील स्वच्छतेस प्रोत्साहन देण्यासाठी 'मुंबई क्लीन लीग' स्पर्धा सुरु करण्यात येणे, मुंबई शहरातील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी बांधकाम व पाडकाम कचरा (C & D Waste) व्यवस्थापन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणे, मुंबई (अंधेरीतील सबवेसह) विविध भागात पावसाळयात साचणाऱ्या पाण्यापासून संरक्षण देण्यासाठी आयआयटी, मुंबईच्या, सहकार्याने सर्वसमावेशक पूरनियंत्रण आराखडा तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणे, अंधेरी पूर्व येथे शासनाचे सुसज्ज रुग्णालय निर्माण करण्याची आवश्यकता, अंधेरी पूर्व येथील सुभाषनगर या झोपडपट्टीत पाणी पुरवठा करण्यासाठी डोंगरमाथ्यावर जलकुंभ बांधण्याची आवश्यकता, मुंबईतील पार्किंग समस्येच्या निराकरणासाठी २७ प्रशासकीय विभागांमध्ये भूमिगत पार्किंग सुविधा करण्याकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येणे, १४ वर्षांच्या मुलींना मोफत

एचपीव्ही लस देण्याची मोहिम सुरु करण्यात येणे, यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता, तसेच महानगराची लोकसंख्या आणि मिळणारे पाणी यामध्ये ६०० एमएलडीची तफावत असल्याने २०३०-३२ पर्यंत पाण्याची मोठया प्रमाणावर लागणारी आवश्यकता, या बाबी विचारात घेता दीर्घकालीन जलसुरक्षेसाठी पर्यायी जलस्त्रोतांचा शोध घेण्यात येणे, शहरातील नैसर्गिक तलाव, तळी व जलाशय याचे पुर्नरुज्जीवन करणे, तसेच प्रस्तावित डिसॅलिनेशन प्रकल्पाची क्षमता वाढविण्याची आवश्यकता, मुंबई शहरातील वाढत्या घनकचऱ्यांचे शास्त्रोक्त प्रक्रियेद्वारे व्यवस्थापन करुन 'वेस्ट टु एनर्जी' तत्वावर वीज निर्मिती प्रकल्पांना चालना देण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेतील जन्म व मृत्यू दाखल्याच्या नोंदीमध्ये सुमारे ८७ हजार प्रकरणात फेरफार झाल्याचे व १८ हजार प्रकरणांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास येणे, संबंधित दोषींवर कठोर कारवाईची आवश्यकता, मुंबईतील एअरपोर्ट फनल झोन मधील बाधित इमारती तसेच एसआरओ १५० जुहू मिलिटरी ट्रान्समिशन स्टेशन मधील पुनर्विकासाकरिता 'हौसिंग फॉर ऑल' पॉलिसीअंतर्गत संबंधितांना दिलासा देण्यासाठी नियम करणे, खुल्या सार्वजनिक जागांबाबतचे तसेच फेरीवाला क्षेत्राचे धोरण अंतिम करण्याची आवश्यकता, आयआयटी मुंबईच्या सहकार्याने तयार करण्यात आलेल्या पूरनियंत्रण प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, मुंबईतील जवळपास ५० टक्के लोकसंख्या झोपडपट्टीमध्ये असून तेथील स्वच्छता व्यवस्थापनासाठी राबविण्यात येणारी 'दत्तक वस्ती योजना' अपेक्षित परिणाम साधण्यात अपयशी ठरत असल्याने त्यात व्यापक सुधारणा करण्याची आवश्यकता, बीडीडी चाळी व धारावी पुनर्विकासाला चालना मिळणे, स्वयं पुनर्विकासाकरिता एक वेगळे प्राधिकरण नेमून त्याची अंमलबजावणी करण्यात येणे, पागडीच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून करण्यात आलेल्या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, वांद्रे ते वर्सोवा सीलिंकचे काम सुरु असून वर्सोवा ते भाईंदर या उत्तर दिशेच्या कोस्टल रोडचे काम सुरु असल्यामुळे मुंबई व एमएमआर विभागातील वाहतूकीच्या समस्येचे निवारण होत असणे, साधारणतः ५० टक्के मेट्रोचे काम पूर्ण झाले असून उर्वरित ५० टक्के काम जलदगतीने सुरु असणे, मुंबईची वाहतूक कोंडी सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मुंबई शहरामध्ये सागरी मार्ग (वॉटरवेज ट्रान्सपोर्ट) सुरु करण्याकरिता स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना होणे, क्रांतीनगर ते गोरेगाव या १२० फुटांच्या डीपी रोडचे काम लवकरात लवकर सुरु करण्याची आवश्यकता, कांदळवन क्षेत्रांमध्ये सन २००० पूर्वीपासून वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांना शासनाच्या विद्यमान धोरणानुसार कोणतेही संरक्षण उपलब्ध नसणे, त्यामुळे सदर पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विशेष धोरण निश्चित करुन तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, तसेच मुंबई शहराचा सर्वांगीण विकास व मुंबई शहरातील घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक २४ जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतू पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना)**

(१) **श्री. रईस शेख, वि.स.स.**

"भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याबाबत" या विषयावरील श्री. रईस शेख, वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २४ मधील प्रश्न क्रमांक १९१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(मंगळवार, दिनांक ३० जून, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतू पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ ते ४)**

**(२) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"भुसावळ (दीपनगर) (जि.जळगांव) तालुक्यातील औष्णिक विद्युत केंद्रात 'पॉड ॲश' विक्री लिलाव प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता" या विषयावरील श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३१७१३ ला दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(३) श्री. सुभाष देशमुख, वि.स.स.**

"सोलापूर मधील महानगरपालिकेचे महात्मा गांधी प्राणीसंग्रहालय बंद असल्याबाबत" या विषयावरील श्री. सुभाष देशमुख व इतर वि.स.स. यांचा दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३३ मधील प्रश्न क्रमांक २८३० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील वैधानिक विकास महामंडळांचे पुनर्गठन करून प्रादेशिक समतोल राखणेसह विदर्भाचा वाढता अनुशेष दूर करण्याबाबत" या विषयावरील श्रीमती सुलभा खोडके व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३२९३२ ला दिनांक २३ जून, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ३० जून, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.